


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६३१ . वा | सोमवार | दि. १८ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# गैरव्यवहार प्रकरणी जिजाऊ बँकेवर कारवाईस एव्हढी टाळाटाळ का?

## जलसंपदा विभाग, सहकार विभाग, निबंधक कार्यालय सर्वांचेच अक्षम्य दुर्लक्ष...

**जनसंचलन/ बुलढाणा**

गेल्या काही वर्षांमध्ये विविध प्रकारच्या अनियमितता, गैरव्यवहार, भ्रष्टाचार या प्रकरणी बऱ्याच बँकांवर कारवाई करण्यात आलेली आहे. मात्र, प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार, गैरव्यवहार, अनियमितता आणि नियमांची पायमल्ली हे सर्व काही होऊन देखील जिजाऊ कमर्शियल बँक अमरावती या बँकेवर अद्यापही कोणतीच कारवाई नाही. जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेवर एव्हढी मेहेरनजर कशासाठी असा प्रश्न या निमित्ताने अनेक जण उपस्थित करीत आहेत. बहुजनांच्या हितासाठी एक वित्तीय संस्था स्थापन करीत असल्याच्या गोंडस नावाखाली जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेची स्थापना करण्यात आली होती. मात्र, या बँकेची स्थापना होत असताना पासूनच यामध्ये एकप्रकारे गैरव्यवहारांची मालिका सुरू झाली होती. त्याचे मुख्य कारण म्हणजे या बँकेच्या संचालक मंडळातील बरेच जण हे त्या वेळी सरकारी नोकरीत असून देखील त्यांनी स्वतःला बेरोजगार असल्याचे भासवले. त्या वेळी ते ज्या सरकारी विभागात कार्यरत होते, त्याच विभागातील आपल्या अधिकाऱ्याची दिशाभूल केली. एव्हढीच नाही तर

**जिजाऊ कमर्शियल अमरावती बँकेचा प्रताप भाग-२०२**

त्यांनी त्या वेळी काही ठिकाणी खोटी प्रतिज्ञापत्रे देखील सादर केली. उपनिबंधक प्रशानसाचीही त्या वेळी दिशाभूल करण्यात आली. विद्यमान अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे हे जलसंपदा विभागात अभियंता म्हणून अनेक वर्षे कार्यरत होते. सरकारी नोकरीत असून देखील आणि अशा प्रकारे बँकेचे संचालकपद स्वीकारणे नियमानुसार नसतानाही त्यांच्यावर जलसंपदा विभागाच्या वतीने आजवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. अविनाश अंबादास कोठाळे यांनी अनेक वर्षे जलसंपदा विभागात नोकरी केली, एव्हढेच नव्हे तर ते सेवानिवृत्त देखील झाले. परंतु तरीही जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याची कोणतीही दखल घेतली नाही. हा संपूर्ण प्रकार कमी होता की काय म्हणून अविनास कोठाळे व त्यांच्या काही संचालकांनी जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेत अनिर्बंधपणे भ्रष्टाचार केला. सहकार विभाग असो किंवा रिझर्व्ह बँक असो कुणाचेही नयिम त्यांनी पाळले नाहीत. बँकेत कोट्यवधी रुपयांचे आर्थिक गैरव्यवहार केले. हजारो नियमबाह्य व्यवहार केले. बेकायदेशीर कर्जवाटप, बेकायदेशीर कर्जमाफी, व्याजमाफी केली. नियमबाह्य पद्धतीन एटीएम सुरू केले. बँकेच्या प्रोसिडिंग बुकात मोठ्या प्रमाणा खाडाखोड केली. अनेक






प्रकारचे गैरव्यवहार केल्यानंतरही आजवर जिजाऊ कमर्शिल को-ऑप. बँक अमरावती या संस्थेवर कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील विविध बँकांमधील गैरव्यवहार उघडकीस आलेल. त्यामुळे रिझर्व्ह बँक असो किंवा सहकार खाते यांच्याकडून या बँकांवर कारवाया करण्यता आल्या. अनियमितता केल्याबद्दल नुकतीच अभ्युदय बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमला. रिझर्व्ह बँकेने आजवर ज्या बँकांवर कारवाया केल्या, त्यापेक्षाही भयंकर गैरप्रकार हे जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक अमरावतीत झालेले आहेत. परंतु सहकार विभाग किंवा रिझर्व्ह बँकेने यासंदर्भात कोणतीही कारवाई केली नाही. एव्हढेच नव्हे तर एव्हढी मोठी दिशाभूल करून देखील जलसंपदा विभागाकडूनही कोठाळे व त्यांच्या सहकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे या भ्रष्टाचाराच्या व्याप्तीची कल्पना येऊ शकेल. नुकतीच बँकेची कलम ८९ अंतर्गत चौकशी करण्यात आली. या चौकशीत बँकेच्या कामकाजाबाबत अत्यंत गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. त्याच रिपोर्टच्या आधारावर सध्या बँकेची आणखी एक चौकशी होऊ घातली आहे. असे असताना महाभ्रष्टाचारी अविनाश अंबादास कोठाळे व त्यांचे काही लुटारू संचालक हे पुन्हा एकदा निवडणुकीच्या माध्यमातून बँकेवर कब्जा प्राप्त करू इच्छीत आहेत.

उर्वरित पान २ वर

## दारूसाठी पैसे न दिल्याने तिघांचा - तरुणावर हल्ला

**जनसंचलन/ खामगाव**



दारू पिण्यासाठी पैसे ना दिल्याने एका युवकास तिघांनी संगनमत करून धारदार शस्त्राने मारहाण केली. ही घटना शुक्रवारी रात्री कोठारी फैल भागात घडली. याप्रकरणी शहर पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला. याबाबत सत्यविजय कांबळे (रा. चांदमारी) याने शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यामध्ये रात्री आठ वाजतादरम्यान कोठारी फैलातील एका शाळेजवळ उभा होता. त्यावेळी शिंदे नामक युवक तेथे आला. त्याच्या सोबतच ओम जंजाळ आणि ऋतिक इंगळे हे दोघेही तिथे आले. कांबळे याला दारू पिण्यासाठी पैसे मागितले पैसे देण्यास नकार दिल्याने ओमा जंजाळ याने धारदार शस्त्राने गालावर, हातावर आणि डोक्यावर मारहाण केली.व तर शिंदे आणि इंगळे यांनी हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले. याप्रकरणी पोलिसा तक्रार आणि वैद्यकीय अहवालावरून शहर पोलिसांनी उपरोक्त तिघांविरोधात भादंवि कलम ३२४, ३४ गुन्हा दाखल केला. पुढील तपास शहर पोलिस करीत आहेत.

## दुचाकी अपघातामध्ये एक ठार, तीन जखमी...

**जनसंचलन/धाड**

येथील बायपास मार्गावर राजर्षी शाहू महाविद्यालयाजवळ झालेल्या दुचाकी अपघातामध्ये एक जण ठार झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना छत्रपती संभाजीनगर येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. हा अपघात १६ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास घडला. बुलढाण्याकडून करडीकडे जात असताना बायपासवर लावण्यात आलेल्या लोखंडी संरक्षक कठड्यावर ही दुचाकी धडकल्याने हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. मृतक व जखमी हे छत्रपती संभाजीनगरमधील खुलताबाद तालुक्यातील ताजनापूर येथील रहिवासी आहेत. बुलढाणा येथून ते गावाकडे (एमएच-२०- जीएल-६१८८) क्रमांकाच्या दुचाकीने





जात असताना बायपासवरील एका वळणावर हा अपघात झाला, स्थानिक नागरिकांना त्याची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तातडीने बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी हलविले. दरम्यान, जखमींपैकी अनिकेत गणेश काळे (२६) याचा मृत्यू झाल्याची माहिती बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातील सूत्रांनी दिली. गणेशश रामा काळे (२४) आणि आकाश सुधाकर काळे (२५) हे दोघे गंभीर जखमी आहेत. त्यांच्यावर प्रथमोपचार करून त्यांना छ. संभाजीनगर येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले आहे या अपघाताची धाड पोलिसांनी नोंद घेतली असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिवसाई परिवार व मानस फाउंडेशन देणार शिवणकामाचे प्रशिक्षण...

## विधवा महीला रोजगारासाठी व्यवसायीकांनी पुढाकार घ्यावा--प्रा. डी एस लहाने

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात व्यवसायिकांच जाळ मोठे आहे.व्यापर उद्दीम करतांना व्यवसायिकांना कामगारांची गरज नेहमीच भासते. जिल्ह्यात विधवा घटस्फोटीत महिलांची संख्या खूप मोठी आहे. घरातील कर्तासवर्ता पुरुष गेल्याने त्यांना आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागते. अशावेळी त्यांना रोजगार देण्यासाठी व्यापारी वर्गाने अनुकूलता दर्शवून पुढाकार घ्यावा असे आवाहन प्रा. डी एस लहाने यांनी केले आहे. दहा डिसेंबर रोजी बुलढाणा शहरात विधवा महिला परिषद पार पडली. या परिषदेत विधवांसाठी अनेक ठराव घेण्यात आले. त्यानुसार विधवां स्वावलंबनासाठी प्रयत्न केले जाणार आहे. याच वेळी अनेक विधवा महिलांनी आपापल्या समस्या मांडल्या. त्यात महत्वाची समस्या आर्थिक प्रश्न भेडसावत असल्याचे अनुभव अनेकांनी मांडले. काही महिला शिक्षित आहेत. अशा महिलांना बौद्धिक क्षेत्रात काम सहज उपलब्ध होते, संधीही मिळतात. मात्र ज्या महिला जास्त शिकल्या नाहीत अशांना सर्वाधिक रोजगार समश्या भेडसावतात. अशा गरजू महिलांना व्यापारी वर्गाने रोजगाराची संधी द्यावी असे आवाहन शिवसाई परिवारचे अध्यक्ष व विधवा महिला परिषदेचे आयोजक प्रा. डी एस लहने यांनी केले आहे. गाव पातळीवर विधवा महिलांचा सन्मान व्हावा यासाठी जिल्हाधिकारी यांनी परिपत्रक काढले आहे. तसेच त्यांना शासकीय योजनांचा लाभ दिला जात आहे. अशा महिलांना पुनर्विवाहासाठी कृतीयुक्त प्रयत्न देखील मानस फाउंडेशन व शिवसाई कडून केले जात आहेत. त्यांच्या रोजगाराचा देखील प्रश्न मार्गी लागावा म्हणून प्राध्यापक डी एस लहाने यांनी व्यवसायीक मंडळीं यांना आवाहन केले आहे.



महिला परिषद संपल्यानंतर बुलढाणा शहरातील काही समाजाभिमुख लोकांनी शिवणकामाचे माध्यमातून विधवा महिलांना रोजगार देण्याचा प्रयत्न सुरू केलाय. शिवनकामाचे प्रशिक्षण व त्यांनी तयार केलेले कापड येथील व्यापारी वर्गाला दिले जाणार आहे. यासाठी काही व्यापाऱ्यांशी बोलणे देखील झाल आहे. याची तयारी पूर्णत्वास आली आहे. लवकरच हे केंद्र बुलढाणा येथे सुरू होते.

# पान १ वरून गैरव्यवहार प्रकरणी जिजाऊ बँकेवर...

पुन्हा या महाभ्रष्टाचाऱ्यांचा बँकेवर कब्जा झाल्यास बँकेला कोणीही वाचवू शकणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे उपनिबंधक कार्यालय असो की सहकार विभाग यांच्याकडून याबाबत तातडीच्या उपाययोजना जरुरी आहेत. तसेच जलसंपदा विभागातील ज्या अधिकाऱ्यांनी सातत्याने कोठाळे व त्यांच्या सहकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला, त्या दोषी अधिकाऱ्यांवरही कारवाईची आवश्यकता आहे. सध्या ही बँक वाचवण्यासाठी तसेच बँकेत गैरव्यवहार करणाऱ्यांच्या विरोधात हिवाळी अधिवेशनावर उपोषण देखील सुरू आहे. मागील वर्षीदेखील जेंव्हा अशाप्रकारचे उपोषण करण्यात आले होते, त्या वेळीदेखील सहकार आयुक्तांनी केवळ वेळकाढूपणा केला होता. गेल्या वर्षभरात बँकेच्या संचालकांवर म्हणावी तशी कोणतीही प्रभावी कारवाई करण्यात आली नव्हती. त्यामुळे पुन्हा एकदा उपोषण सुरू करण्यात आले आहे. किमान या वेळेस तरी सरकारी यंत्रणेला कुंभकर्णी झोपेतून जाग यावी आणि त्यांनी बहुजनांच्या हितासाठी स्थापन करण्यात आलेल्या या बँकेला बहुजनांच्या हितासाठीच वाचवण्याचा प्रयत्न करावा, अशी अपेक्षा अनेक जण व्यक्त करीत आहेत. त्यामुळे किमान जनमताचा तरी आदर ठेवून आता सरकारी यंत्रणेने सक्रिय होण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेला लुटणाऱ्या दोषींवर कारवाई होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज आपली मोहीम बँकेचे ठेवीदार, भागधारक यांच्या हितासाठी अशीच सुरू ठेवणार, यात काही शंका नाही.

**अजून बरचे काही पुढील भागात...**

# सोलार कंपनीतील स्फोटात ९ जणांचा मृत्यू, कामगारांची प्रवेशद्वारावर घोषणाबाजी...

**वृत्तसंस्था/नागपूर**



नागपुरातील सोलार इंडस्ट्रीजमध्ये झालेल्या स्फोटात ६ महिलांसह ९ लोकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली.संरक्षण क्षेत्रासाठी शस्त्रास्त्रांचे उत्पादन सोलार ग्रुप कडून केलं जातं. या कंपनीच्या बाजारगाव येथील इकॉनॉमिक एक्स्प्लोजिव्ह लिमिटेड या आयुध निर्माण कंपनीत आज स्फोट झाला सोलार इंडस्ट्रीजमध्ये स्फोट झाल्यानंतर वेगवेगळ्या युनिटमधील सर्व कर्मचारी बाहेर पडले. सकाळी ९ ते साडे नऊ वाजतादरम्यान ही घटना घडली असून अद्याप कामगारांचे मृतदेह बाहेर काढण्यात आलेले नाहीत. तसेच त्या युनिटमधील बचावलेल्या मात्र गंभीर जखमी असलेल्या कामगारांनादेखील दुपारी दीड वाजेपर्यंत उपचारासाठी दवाखान्यात हलविण्यात आले नव्हते.या घटनेनंतर कामगारांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला होता. जोपर्यंत मृत कामगारांचे मृतदेह मिळत नाही तोपर्यंत कंपनीच्या प्रवेशद्वाराहून हटणार नसल्याची भूमिका कामगारांकडून घेण्यात आली होती. स्थानिक पोलिसांनी परिस्थिती चिघळू नये म्हणून राज्य आपत्ती प्रतिसाद दलाला पाचारण करण्यात आले. संतप्त कामगारांवर वेळ पडल्यास बळाचा उपयोग करून प्रवेशद्वाराहून हटविण्यात येणार होतं. दंगल नियंत्रक पथक देखील घटनास्थळी पोहचले आहे. कामगारांद्वारे प्रवेशद्वारावर घोषणाबाजी सुरू होती. पोलिसांकडून सौम्य लाठीचार्ज करण्यात आला आहे. स्थानिकांनी या दुर्घटनेत नेमका किती जणांचा मृत्यू झाल्याचं माहिती नसल्याचं म्हटलं. स्थानिक लोकांना इथं कामावर घेतलं जात नाही, असं देखील सांगण्यात आलं. घटनास्थळापासून तिनशे मीटर अंतरावरुन पाहणी केली जात असल्याचं स्थानिकांनी म्हटलं. या कंपनीत हजेरीपटावर ज्यांची नावं आढळली त्यांना मृत जाहीर करण्यात आल्याचं स्थानिकांनी म्हटलं. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागपूरमधील या दुर्घटनेत ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या नातेवाईकांना ५ लाख रुपयांची मदत देणार असल्याची घोषणा केली.

मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस लि.पुणे
MITCON™
Solutions for Sustainable Tomorrow
मिटकॉन नेचर बेस्ड सोल्युशन्स लिमिटेड
महोगनी विश्व ॲग्रो लिमिटेड
कृषि-वानिकी : शाश्वत विचार!
देईल पर्यावरण संरक्षणासोबत आर्थिक समृध्दी!
MAHOGANI VISHWA AGRO
MITCON NATURE BASED SOLUTIONS



कृषि-वानिकी : १.भारत हा कृषिप्रधान देश आहे, उत्तम प्रकारची जमीन व हवामान अनुकूल असल्याने कृषि-वानिकीच्या माध्यमातून उत्तम लाकूड निर्मिती हे संस्थेचे ध्येय आहे.
महोगनी लागवडीचे नियोजन: १.पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन असावी.
रोपांची लागवड पध्दती :- • एक एकर क्षेत्रासाठी ४४४ रोपे लागतील.
• लागवडीचे अंतर १०x१० फूट किंवा ८x१२ फूट असावे.
• सरासरी खड्ड्यांची लांबी, रुंदी व खोली १.५ x १.५ x १.५ फुटाची असावी.
भारतात लाकूड उद्योगातील संधी: १. निर्यातक्षम लाकूड निर्मिती करून ग्रामीण भागात उद्योग व रोजगार निर्मीती करणे.
मिटकॉनद्वारे शेतकऱ्यांना मिळणार कार्बन क्रेडिट
महोगनी कृषि-वानिकी लागवडीतून विश्वातील पहिला कार्बन क्रेडिट प्रकल्प

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाण्यात पार पडली राज्यस्तरीय क्रॉस कंट्री निवड व अजिंक्यपद स्पर्धा...

## १९ वर्षानंतर बुलढाणा जिल्ह्याला मिळाला मान, राज्यभरातील तरुणी महिलांसह शेकडो स्पर्धकांचा स्पर्धेत सहभाग...

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र ॲथलेटिक्स असोसिएशन व बुलढाणा जिल्हा ॲमॅच्युअर ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने बुलढाण्यात दि १७ डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास क्रॉस कंट्री निवड व अजिंक्यपद राज्यस्तरीय स्पर्धा पार पडली. यावेळी विविध वयोगटातील आणि विविध किलोमीटरची ही रनिंग स्पर्धा पार पडली, बुलढाणा जिल्ह्याला २० वर्षानंतर या स्पर्धेचे आयोजन करण्याचा मान मिळाला आहे, या स्पर्धेमध्ये राज्यभरातून ५०७ तरुण-तरुणी आणि महिलांनी उत्स्फूर्तपणे आपला सहभाग नोंदवला आहे.या स्पर्धेत प्रमुख उपस्थितीत मध्ये बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड,अमरावती विभाग विधान परिषद आमदार धिरज लिंगाडे,राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हाध्यक्ष अनुजाताई सावळे, आदी पदाधिकारी उपस्थितीत होते.या स्पर्धेत पुरुष १० किलोमीटर मध्ये सादाब पठान नागपूर,उत्तम पाटील कोल्हापूर, सौरभ तिवारी नागपूर,अभिषेक देवकाटे कोल्हापूर, विष्णू उन्हाळे परभणी,राजन यादव नागपूर या स्पर्धेत यांची निवड झाली तर महिला १० किलोमीटर मध्ये रिया तोठारे नागपूर, तेजस्वीन लमकाठे नागपूर, प्रणाली शेगोकार बुलढाणा, सजोनी लव्हाळे अमरावती, योगीणी साळूंके उस्मानाबाद,पुजा पंचदुधे नागपूर या स्पर्धेत यांची निवड झाली. २० वर्षाआतील मुले ८ किलीमीटर मध्ये दर्शत घुमरे सांगली, कुमार मादणे सोलापूर, युवराज वटके कोल्हापूर, प्रथमेश देशमुख वाशिम, स्वराज पाटील रायगड, ज्ञानेश्वर भालसिंग अहमदनगर यांची निवड करण्यात आली आहे. २० वर्षाआतील मुली ६ किलोमीटर मध्ये साक्षी यादल रत्नागिरी, मिताली भोयार नागपूर, सानिका रूपनार सांगली,सुस्टी रेडेकर कोल्हापूर, प्राची देवकर सातारा, आरती भगत गोदीया यांची निवड करण्यात आली आहे. १८ वर्षाआतील मुले ६ किलीमीटर मध्ये रोहित बिन्नर नाशिक,सचिन यादव मुंबई यांची निवड करण्यात आली आहे. १८ वर्षाआतील मुली ४ किलीमीटर साक्षी भंडारी अहमदनगर, भाग्याश्री महाले नागपूर यांची निवड करण्यात आली आहे.



१६ वर्षाआतील मुले २ किलीमीटर मध्ये कार्तिक चव्हाण अकोला, अर्थव ताठे सातारा, तर १६ वर्षाआतील २ किलोमीटर मध्ये जनव्ही हिरदुरकर नागपूर,आर्या भगते सातारा यांची निवड करण्यात आली आहे.आता यामध्ये १० किलोमीटर पुरूष आणि महिला यांच्या मधील ३ स्पर्धक,८ किलोमीटर मध्ये मुले आणि मुली यांच्यातील ३ स्पर्धक,८ व ६ किलोमीटर मध्ये मुले आणि मुली मधील २ असे एकूण ८ स्पर्धकांची निवड त्यांच्या टाईमानुसार नॅशनल खेळण्याकरिता करण्यात येणार आहे महाराष्ट्राच एक गट म्हणून त्यांना त्या ठिकाणी पाठविण्यात येणार आहे आणी पुढे त्यांना ऑलमपिंग साठी सुध्दा त्यांना संधी असणार आहे

# व्यंकटगिरी नटली : ब्रह्मोत्सवास थाटात सुरुवात...

**जनसंचलन/बुलढाणा**

राजूर घाटातील व्यंकटगिरी पर्वत सध्या आकर्षक रोषाणाई आणि फुलांच्या तोरणाने नटला आहे. बालाजी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १६ डिसेंबर रोजी सकाळी बालाजी सेवा समितीचे अध्यक्ष अरुण दिवटे यांनी सपत्नीक गरुड पूजन करुन व गरुड ध्वज चढवून ब्रह्मोत्सवाचा प्रारंभ झाला. यावेळी बालाजी सेवा समितीचे सदस्य व बालाजी भक्तांनी सपत्नीक हजेरी लावली होती. या सर्वांच्या उपस्थितीत संकल्प, पुण्यवचन, यज्ञ शाळा प्रवेश आणि बालाजी परिक्रमेने या उत्सवाची थाटात आणि मोठ्या भक्तीभावाने सुरुवात झाली आहे. १७ डिसेंबरपासून संगीत भजन तसेच हभप. ज्ञानेश्वर विष्णू महाराज यांच्या कीर्तनास सुरुवात होणार आहे.

बालाजी सेवा समिती आणि बालाजी भक्त परिवारच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही ब्रह्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. १६ डिसेंबर रोजी सकाळी संकल्प, पुण्यवचन, यज्ञ शाळा प्रवेश आणि बालाजी परिक्रमेने ब्रह्मोत्सवाला सुरुवात झाली. तर रविवार, १७ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते १२ व सायंकाळी ५ ते ८ संकल्प, यज्ञ शाळा, महासुदर्शन होम व बालाजी परिक्रमा, सोमवार, १८ डिसेंबर रोजी सकाळी ७८ ते १२ संकल्प, पुण्यवचन, यज्ञ पूजन आणि बालाजी परिक्रम तर सायंकाळी ७ ते साडेआठ या वेळेत कल्याणोत्सव अर्थात श्रीदेवी व भुदेवी यांच्यासोबत बालाजींचा विवाह सोहळा पार पडणार आहे आणि त्यानंतर ८.३० ते १० वाजेपर्यंत महाप्रसाद वितरण होणार आहे. १९ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते १२ संकल्प, पुण्यवचन, १०८ कलश पुजन आणि पूर्णाहुती सोहळा होणार असून दुपारी १२.३० ते १ महाआरती होणार आहे. त्यानंतर काल्याचे कीर्तन व नंतर महाप्रसाद वितरणास सुरुवात होणार आहे. ब्रह्मोत्सवादरम्यान दररोज दुपारी २ ते ३ या वेळेत संगीत भजन रंगणार आहे तर ३ ते ५ या वेळेत कीर्तन होणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज जन्म संस्थान आपेगाव, ता. पैठण. चे अध्यक्ष हभप. अध्यात्म विवेकी ज्ञानेश्वर विष्णू महाराज, कोल्हापूरकर दादा हे कीर्तन सेवा देणार आहेत. तसेच काल्याचे कीर्तन देखील त्यांच्या अमृतवाणीतून होणार आहे. ब्रह्मोत्सवाच्या निमित्ताने पहिल्यांदाच हभप. ज्ञानेश्वर विष्णू महाराज यांचे कीर्तन श्रवण करण्याची संधी भाविकांना मिळणार आहे. त्यासाठी भव्य असे स्टेट आणि मंडप व्यवस्था करण्यात आली आहे. बालाजी सेवा समितीचे पदाधिकारी आणि बालाजी भक्त सर्व व्यवस्था चोखपणे बजावत असल्याचे दिसून येत आहे. ब्रह्मोत्सवाच्या पहिल्या दिवशी सकाळपासूनच भाविकांची गर्दी पहावयास मिळाली. सायंकाळी छप्पन भोग प्रसाद पार पडला.

# १३ वी राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धा

**जनसंचलन / बुलढाणा**



१३ वी राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धा मालवण जिल्हा सिंधदुर्ग दि.१६/१२/२०२३ रोजी संपन्न झाली. यामध्ये ३ किलोमिटर प्रकारात बुलढाणा येथील हर्ष विष्णुभगवान गाढे, तमिस राजू वैष्णव, व्यंकटेश शैलेश वाघ,अक्षदा अनंत बेंडाले, विष्णु भगवान गाढे,लेखाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यांनी ३ किलोमीटर मध्ये ९ क्रमांकावर प्रावीण्य प्राप्त, विठ्ठल रामभाऊ चव्हाण २ किलोमिटर मध्ये ९ क्रमांकावर प्रावीण्य प्राप्त केले तसेच ॲड. शरद राखोंडे यांनी सुद्धा स्पर्धा यशस्वी पुर्ण करुन २ किलोमीटर या प्रकारात कार्तिक मोहन दाभने, तसेच भाग्यश्री संतोष जाधव, बुलढाणा जिल्ह्याचा मान वाढविला. १ किलोमीटर मध्ये ऋतूजा शेलार, ५ किलोमिटर मध्ये दिव्या शेलार, रा. दुधा हिने ८ व्या क्रमांकावर प्रावीण्य प्राप्त केले. ३ किलोमिटर मध्ये एस.टी.महामंडळ, मलकापूर येथील सोनाली पाटमासे यांनी ४ क्रमांकावर प्रावीण्य मिळविले आहे. जवळपास सर्वा स्पर्धकांनी आयोजकांनी ठरून दिलेल्या वेळेत अंतर पूर्ण केले याचे मार्गदर्शक मनोज व्यवहारेसर, तसेच संदीप जाधव यांनी अथक प्रयत्न केले. सर्वत्र खलादुंचे कौतुक होत आहे. सर्व मुलांचे पालक हजर होते

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्यासह शेतकरी बांधव नागपूर अधिवेशनावर आंदोलन करणार...

**जनसंचलन/बुलढाणा**

येलो मोझॅक,बोंडअळी व पावसात खंड पडल्याने झालेल्या नुकसानीपोटी १००% नुकसान भरपाई मिळावी, सोयाबीन-कापसाला दरवाढ मिळावी,पिकविम्याची १००% फायनल रक्कम लवकर मिळावी, यासह अन्य मागण्यांसाठी रविकांत तुपकरांच्या नेतृत्वाखाली गेल्या २ महिन्यांपासून सोयाबीन-कापूस उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरला आहे, एल्गार रथयात्रा, २० नोव्हेंबर रोजी बुलढाण्यात झालेला एल्गार महामोर्चा, सोमठाणा येथे रविकांत तुपकरांचे अन्नत्याग आंदोलन व मुंबईत मंत्रालय ताब्यात घेण्यासाठी हजारो शेतकऱ्यांनी दिलेली धडक यामुळे राज्य सरकारने २९ नोव्हेंबर रोजी शेतकऱ्यांशी चर्चा केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या चर्चेत बहुतांश मागण्या त्यांनी मान्य केल्या. तसेच सोयाबीन-कापूस दरवाढीसंदर्भात केंद्रीय वाणिज्यमंत्री ना.पियूषजी गोयल व उपमुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्यासोबत ९ डिसेंबर रोजी बैठक झाली. काही गोष्टींसाठी सरकार सकारात्मक असल्याचे बैठकीत केंद्रीय मंत्री गोयलांनी सांगितले. मागण्यांची अंमलबजावणी करण्यासाठी शेतकऱ्यांनी सरकारला १५ डिसेंबर पर्यंतची मुदत दिली होती. ती मुदत संपली पण सरकारने अद्याप शेतकऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात अंमलबजावणीला सुरवात केली नसल्याने, शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा



आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. त्यानुसार १८ डिसेंबर रोजी समृद्धी महामार्गावरील मेहकर जवळील फर्दापूर टोल येथून दु.१२.०० वा. शेतकरी नागपूरच्या दिशेने रवाना होतील व १९ डिसेंबर रोजी सकाळी ९.०० वा. अधिवेशनावर हल्लाबोल आंदोलन करणार आहेत.

# अमोल कोल्हेंची अजित पवार गटावर जोरदार टीका; म्हणाले- डरकाळी फोडणारे कधी दिल्लीला प्रश्न विचारणार नाहीत...

वृत्तसंस्था/रायगड

शरद पवारांनी काय केलं असा जेव्हा प्रश्न विचारला जातो त्या वेळेला समोर प्रश्न विचारण्याच्या आधी कानाखाली जाळ काढावासा वाटतो. विचारावं असं वाटतं की काय काय नाही केलं ते आधी सांग. मग ती सिडकोची निर्मिती असेल, माथाडी कायदा असेल, सातारा पाटण भागातील अनेक माथाडी कामगार येथे राहतात. माथाडी कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी पवार साहेबांनी केलेली धडपड असेल. हे सगळे या परिसराने पाहिला आहे, अशा शब्दात खासदार अमोल कोल्हे यांनी विरोधकांना खडे बोल सुनावत शरद पवार यांच्या कामांच्या आठवणींना उजाळा करुन दिला.

पनवेल येथे ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात कोल्हे यांनी अजितदादांच्या राष्ट्रवादीला सुनावत विरोधकांचा समाचार घेत लाचार अशी उपमा दिली आहे. अलीकडे कर्जत येथे झालेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या शिबिराचा उल्लेख करत अमोल कोल्हे यांनी समाचार घेत या शिबिराकडे रायगडाने सुद्धा डोळे वटारून पाहिलं की या शिबिरामध्ये नकली आयाळ लावलेले सिंह डरकाळ्या फोडत होते. तेव्हा त्या रायगडाने सुद्धा डोळे वटारुन पाहिलं. माझ्या अंगा खांद्यावर खेळलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलदेश्वरांसमोर स्वाभिमानाची डरकाळी फोडली होती. आज त्याच रायगडात येऊन दिल्लीसमोर लोटांगण घालणारी माणसे बोलतात, अशा शब्दात अमोल कोल्हे यांनी अजित दादांच्या राष्ट्रवादीचा समाचार घेतला आहे.आता लोकच म्हणतात लग्न करताना पत्रिका पाहिली जाते तसं आता राजकारणाची पत्रिका बघितली पाहिजे. त्यामध्ये कुठे इन्कम टॅक्स सीबीआय असे ग्रह नाहीत ना. त्यामुळे इथून पुढे मतदान केंद्रावर बटन दाबताना पत्रिका पाहायला विसरू नका, असा जोरदार टोमणा खासदार अमोल कोल्हे यांनी लगावला आहे. याच रायगडच्या भूमीने उभे जगाला दोन प्रसंगात स्वाभिमान शिकवला आहे. रायगडच्या भूमीने दाखवून दिलं की दिल्लीच्या तख्तासमोर झुकायचे नसते तर ताठ मानेने स्वाभिमानानं उभं राहायचं असतं. छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगडावर झालेला शिवराज्याभिषेक महाराजांनी स्वाभिमान निवडला आणि म्हणूनच साडेतीनशेवर्षांनंतर नंतर महाराजांचं नाव घेतलं जातं, असं सांगत त्याने कार्यकर्त्यांमध्ये स्वाभिमानाचा अंगार फुलवण्याचा प्रयत्न केला. याच रायगडमध्ये दुसरी घटना भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्यावर केलेला सत्याग्रह जिथे पुन्हा स्वाभिमान जागवला. जो मानवतेचा स्वाभिमान होता. जो मनुवादी प्रवृत्ती समोर झुकायचं नाही तर माणूस म्हणून ताठ मानेने उभं राहायचं याचाही आवर्जून उल्लेख कोल्हे यांनी केला. लाचारी करून जर का मान दुखावली तर नजरेला नजर मिळवून प्रश्न विचारता येत नाहीत. म्हणून फक्त पक्षांच्या शिबिरांमध्ये डरकाळी फोडणारे कधी दिल्ली श्वरांना प्रश्न विचारू शकत नाहीत. माझ्या कांद्याची निर्यात का बंद केली.



माझ्या शेतकऱ्याला दुधाला भाव मिळाला पाहिजे. हे दिल्ली शहराला सांगू शकत नाहीत की माझ्या महाराष्ट्रातले उद्योगधंदे का पळवलेत अरे कुठला स्वाभिमान सांगतात आणि कुठले प्रश्न विचारत आहात. हा प्रश्न आता जनता विचारते आहे, अशा शब्दात अजितदादांच्या राष्ट्रवादीचाही त्यांनी समाचार घेतला आहे.उत्तरेकडे आयोध्याची चर्चा असली तरी महाराष्ट्राच्या मनात पंढरी आहे. कुणाच्या मुखात जय श्रीराम असलं तरी महाराष्ट्राच्या मनात राम कृष्ण हरी आहे. भगवंतांना पायरीच्या दगडाला भेटायला यावं. तुझं माझं एकच तुझं माझं काही नाही. अनेक वर्षांची उपेक्षा नाहीशी करावी तसा हा योग पवार साहेबांचे उपस्थितीने पनवेल येथे जुळून आला आहे, अशा शब्दात खासदार अमोल कोल्हे यांनी शरद पवार यांच्या उपस्थितीचे कौतुक केले. स्वतः च्या आजारपणाची परवा न करता जो पक्ष २५ वर्ष जपला वाढवला आणि त्याच पवार साहेबांना निवडणूक आयोगाच्या सुनावणी येथे जाताना अनेकांनी पाहिलं. प्रत्येक मराठी माणसाच्या डोळ्यात पाणी आलं अशाही भावना खासदार अमोल कोल्हे यांनी व्यक्त केल्या. ज्या नेत्यांने अख्खी ५५ वर्ष महाराष्ट्रासाठी चंदनासारखी झिजवली. त्याच पवार साहेबांवर आज ज्यांनी ही वेळ आणली त्यांना जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. असंच प्रत्येकाने ठरवलं आहे. हाच निर्णय आपल्याला पनवेलकरांनो घ्यायचा आहे, अशी सादही अमोल कोल्हे यांनी घातली.

## मोदी सरकारने गरिबांचे जीवनमान सुधारले; पंतप्रधानांच्या निर्णयांबाबत अमित शहा यांचे वक्तव्य

वृत्तसंस्था/ अहमदाबाद

देशातील ६० कोटी गरीब लोकांचे जीवनमान सुधारण्याची मोठी कामगिरी मोदी सरकारने केली आहे,फ असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी केले. अहमदाबाद जिल्ह्यातील साणंद येथे आयोजित ङ्गविकसित भारत संकल्प यात्रेफ्ला संबोधित करताना शहा बोलत होते. ङ्गप्रत्येकाने आपला देश विकसित होण्यासाठी प्रयत्न करावेत. देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी बलिदान दिले त्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्न करावेत,फ असे आवाहनही त्यांनी या वेळी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राइक करून भारताला सुरक्षित केले. कलम ३७० रद्द करण्याचे अपूर्ण स्वप्न पूर्ण केले. अयोध्येत राम मंदिर बांधण्याचे काम हाती घेतले. चांद्रयान मोहिमेद्वारे



देशाचा झेंडा चंद्रावर पोहोचवला. अनेकदा पत्रकार मला विचारतात की नरेंद्र मोदींच्या कोणत्या कामगिरीला सर्वाधिक गुण देणार? त्याचे उत्तर मी सहज देईन. या सर्व कामगिऱ्यांपैकी सर्वाधिक गुण द्यायचे असतील, तर देशभरातील ६० कोटी लोकांचे राहणीमान सुधारण्याचे काम सरकारने केले आहे, त्यालाच मी सर्वाधिक गुण देईन, असे या वेळी शहा म्हणाले.या सर्व गरिबांच्या घरी नळाच्या पाण्याचे कनेक्शन, गॅस सिलिंडर; तसेच त्यांना शौचालयासह स्वतःचे घर देण्यात आले. त्या सर्वांना पाच लाख रुपयांपर्यंतची औषधे मिळतात; तसेच रुग्णालयात मोफत उपचार होतात. या लोकांना पाच किलो धान्य मिळते. यापेक्षा दुसरे कोणतेच मोठे काम होऊ शकत नाही, असे शहा यांनी सांगितले.

## लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने कंबर कसली, ठाण्यात शिंदे गटाच्या जोर-बैठका...

जनसंचलन/ ठाणे

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात शिवसेनेच्या (शिंदे गट) बैठकांना वेग आला आहे. टेंभी नाका येथील आनंदाश्रमात शिवसेनेचे ठाणे पालिकेतील माजी लोकप्रतिनिधी, विभागप्रमुख व महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये संघटनात्मक कार्यक्रम राबवणे तसेच निवडणुकांमध्ये प्रत्येक बुथवर आघाडी कशी घेता येईल, याबाबत खल करण्यात आला. त्यामुळे ठाणे शहरात निवडणुकांच्या अनुषंगाने शिंदे गट अधिकाधिक सक्रिय झाला आहे. लोकसभा निवडणुका अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत. या निवडणुकांआधी विविध पक्षांकडून पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या जात आहेत. शिवसेना शिंदे गटाने घेतलेल्या बैठकीत प्रत्येक मतदार यादीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी शिवदूत (पक्षातील



कार्यकर्ते) नेमणे, महिला बचत गटांचे मेळावे आयोजित करणे, नागरिकांशी जनसंपर्क वाढवणे या मुद्द्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी माजी महापौर, ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के, ठाणे शहर प्रमुख अशोक वैती, महिला जिल्हाप्रमुख मीनाक्षी शिंदे उपस्थित होते. ठाणे लोकसभेच्या सहा विधानसभा मतदारसंघात अशा पद्धतीने बैठका सुरू आहेत, शिवसेनेच्या सर्व माजी लोकप्रतिनिधी, प्रमुख पदाधिकारी यांच्या उपस्थितीत या बैठका होत असल्याची माहिती ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के यांनी दिली

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| 8x8 cm | 5x8 cm | 5x8 cm |
|---|---|---|
| 1 Month=5000/- | 1 Month=3500/- | 1 Month=3500/- |
| 15 Day=3500/- | 15 Day=2200/- | 15 Day=2200/- |
| 7 Day=2000/- | 7 Day=1500/- | 7 Day=1500/- |
| Hight 8 cm, Width 8 cm | Hight 5 cm, Width 8 cm | Hight 5 cm, Width 23 cm |

**एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| 2600/- | 1800/- | 1300/- |
|---|---|---|
| Hight 12 cm, Width 12 cm | Hight 8 cm, Width 10 cm | Hight 8 cm, Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:

अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com